MHYA170001392024

## निशाणी क्रमांक ०५ वरील अंतरीम पोटगीचा आदेश
## (दिनांक १८/०४/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी प्रकरणाचा अंतिम निकाल लागे पावेतो गैरअर्जदार यांच्याकडून अर्जदारास अंतरीम पोटगी म्हणून प्रति माह रुपये १०,०००/–(अक्षरी–रुपये दहा हजार) मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दि. २५/०३/२०२२ रोजी हनुमान देवस्थान, कळंब येथे समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे झाला. विवाहावेळी गैरअर्जदाराने अर्जदाराच्या वडिलांकडून एकूण १,७५,०००/– रुपये घेतले. तसेच लग्नानंतरही विविध कारणांनी सुमारे ३५,०००/– रुपये घेतले, परंतु परत केले नाहीत. अर्जदाराला लग्नात दागदागिने, घरगुती साहित्य व इतर भेटवस्तू देण्यात आल्या असून त्या सर्व वस्तू सध्या गैरअर्जदाराकडेच आहेत.

**०३.** लग्नानंतर सुरुवातीचे ४–५ महिने चांगली वागणूक दिल्यानंतर गैरअर्जदार दारूच्या व्यसनामुळे अर्जदारास शिवीगाळ, मारहाण व पैशासाठी त्रास देऊ लागला. त्याची आई व इतर कुटुंबीयांनीही अर्जदारास मानसिक व शारीरिक त्रास दिला, जेवण न देणे, जबरदस्तीने मजुरीला पाठवणे व तिच्या चारित्र्यावर संशय घेणे असे प्रकार केले. याबाबत अर्जदाराने पोलीस स्टेशन कळंब येथे तक्रार दिली असून प्रकरण भरोसा सेलमध्ये जाऊन ९/८/२०२३ रोजी तडजोड झाली. परंतु त्यानंतर पुन्हा छळ सुरू झाला.

**०४.** दि. २१/१२/२०२३ रोजी खोट्या आरोपांवरून अर्जदारास मारहाण करून घराबाहेर काढण्यात आले. त्यामुळे तिने वर्धा पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदवून माहेरी कळंब येथे राहण्यास सुरुवात केली. तिचे सर्व दागदागिने व सामान गैरअर्जदाराकडेच आहे.

०५. गैरअर्जदार हा सेंट्रींगचा व्यवसाय करतो. त्यापासून त्याला दरमहा २५–३० हजार रुपये मिळतात. गैरअर्जदाराचे वडीलांची तळेगाव भारी येथील ३ एकर शेतजमिन वहीती करुन वार्षिक ३ लाख उत्पन्न घेतो. तसेच गैरअर्जदार याचे सावंगी मेघे येथे मोठे घर आहे. त्यामुळे गैरअर्जदारावर अर्जदाराशिवाय कोणीही अवलंबून नाही. अर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे अर्जदाराने दरमहा रु.१०,०००/– अंतरीम खावटी देण्याची मागणी केली आहे.

०६. गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्या प्रकरणास त्यांचा लेखी जबाब (नि.क्र.१३) अन्वये दाखल केला आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या लेखी जबाबात गैरअर्जदार यांचे अर्जदार यांच्यासोबत असलेले नातेसंबंध मान्य केलेले आहे. गैरअर्जदाराने पुढे असे म्हणणे मांडले की, ते गरीब शेतकरी आहे. अर्जदार ही कष्टाळु मुलगी आहे अशी माहीती लग्नाचे वेळेला गैरअर्जदारांना देण्यात आली होती. त्यामुळेच दोघांचे लग्न झाले. परंतु नांदायला आलयानंतर अर्जदाराने मला येथे करमत नाही, माझे लग्न जबरदस्तीने करुन देण्यात आलेले आहे, मला चांगला नोकरीवाला मुलगा मिळाला असता असे टोमणे मारणे सुरु केले. गैरअर्जदाराने अर्जदाराची सर्व काळजी घेतली व मागण्या पुर्ण केल्या. परंतु ती उठसुठ माहेरी जायची. अर्जदार घरातील कोणतेही कामे करत नव्हती. त्यामुळे गैरअर्जदाराची म्हातारी आई भांडे धुणे, कपडे धुणे अशी दैनंदिन कामे करायची. गैरअर्जदाराला अर्जदाराच्या बॅगमध्ये एक चिठठी सापडली. ती चिठठी म्हणजेच कळंब येथील एका मुलाने अर्जदाराला दिलेले प्रेमपत्र होते. अर्जदाराने ती बाब बघितल्यावर गैरअर्जदाराच्या हातुन ती चिठठी हिसकली व जाळुन टाकली. त्यानंतर अर्जदाराचे नातेवाईक दुसरे दिवशी घरी आले. गैरअर्जदार घरी नसतांना त्यांनी गैरअर्जदाराचे आईला मारहाण केली व सर्व कपडेलत्ते घेवुन निघुन गेली. त्यानंतर सुध्दा गैरअर्जदाराने अर्जदारास नांदवण्यासाठी बरेच प्रयत्न केले. परंतु अर्जदाराच्या घरच्यांनी गैरअर्जदाराकडे पाच लाख रुपयाची मागणी केली व सोडचिठठी देण्यास सांगितले. अर्जदार

स्वतःहुन गैरअर्जदाराचे घर सोडुन गेलेली आहे. त्यामुळे तिला खावटी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

०७. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने मुख्यत्वे करुन गैरअर्जदार हा दारुच्या नशेखाली अभद्र वर्तन करत होता, मारहाण करत होता व पैशाची मागणी करत होता असे कथन मुख्यत्वेकरुन केलेले आहे. त्यास उत्तर देत असताना गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदारास गैरअर्जदाराचे घरी राहायची इच्छा नव्हती. तसेच तिचे कळंब येथील मुलासोबत प्रेमप्रकरण होते. त्यामुळे ती स्वतःहुन गैरअर्जदाराचे घर सोडुन गेलेली आहे. सदर अर्ज विचारात घेत असतांना प्रथमदर्शनी पुरावा बघणे आवश्यक आहे. ते दर्शविण्यासाठी अर्जदाराने दिनांक २९/०१/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कळंब येथे दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. त्या तक्रार अर्जामध्ये एकंदरीत या अर्जातीलच कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. गैरअर्जदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदाराच्या घरच्यांनी तो घरी नसतांना गैरअर्जदाराचे आईस शिवीगाळ केली व मारहाण केली. परंतु ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करण्यासाठी कोणतीही फिर्याद पटलावर दाखल केलेली नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या प्रेम प्रकरणाबाबत केलेला आरोप सिध्द करण्यासाठी संपरिक्षेची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत गैरअर्जदाराचे कथनावरुन ही बाब सिध्द झाली असे म्हणता येणार नाही.

०८. या व्यतिरिक्त हे ही नमुद करणे आवश्यक आहे की, सामान्यतः कोणतीही भारतीय स्त्री तीचे लग्न झाल्यानंतर पतीचे घर सोडून माहेरी कोणतेही कारण नसतांना स्वेच्छेने आश्रयाने जावून राहत नाही. तिला जर तिच्या पतीकडून त्रास झाला असेल तर तो सहन करुन देखील ही पतीकडेच राहणे पसंत करते. परंतू, पती अथवा त्यांचे कुटूंबीय यांच्याकडून होणारा त्रास असह्य असेल तर केवळ नाईलाजास्तव तिला तिचे घर सोडून तिच्या नातेवाईकांकडे अथवा माहेरी आश्रयीत व्हावे लागते. त्यामुळे अर्जदार यांच्या

कथनास सकृतदर्शनी बळकटी मिळते. यावरुन गैरअर्जदाराने अर्जदार ही त्याची पत्नी असताना सुद्धा भरण पोषणाची कोणतीही व्यवस्था केलेली नसल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध होते.

०९. एकंदरीत अभिलेखावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार ही आज रोजी माहेरी राहत आहे व आईवडीलांच्या कृपेवर स्वतःचा चरितार्थ व दैनंदिन गरजा भागवत आहे. अर्जदार यांनी कथन केले की, गैरअर्जदार याला सेंट्रीगचे कामातुन २५,०००/– ते ३०,०००/– चे मजूरी मिळते. तसेच त्याचे वडीलांची तळेगांव भारी येथे असलेल्या तीन एकर शेतजमिनीतुन सुध्दा वर्षाला ३ लाख रुपये मिळतात. सदर प्रकरणामध्ये अर्जदाराने तिचे संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र पटलावर दाखल केले आहे. परंतु गैरअर्जदाराने ते शपथपत्र दाखल केलेले नाही. या व्यतिरिक्त गैरअर्जदाराच्या नेमक्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा अर्जदाराने पटलावर दाखल केलेला नाही. परंतु, गैरअर्जदाराला कोणताही शारिरीक व्यंग आहे असे कुठेही लेखी जबाबात नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे तो काम करण्यास सक्षम आहे.

१०. गैरअर्जदार हे अर्जदार यांचे पती असल्यामुळे तिचा सांभाळ करण्याची नैतिक व संविधानीक जबाबदारी गैरअर्जदार यांच्यावर असून तो ती नाकारु शकत नाही. करिता, वर चर्चिलेवरुन गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत ठोस पुरावा नसल्यामुळे त्याच्या काम करण्याच्या क्षमतेवरुन अंतरीम पोटगीचा रक्कम ठरवणे न्यायोचित ठरेल. अर्जदार आज रोजी तिचे माहेरी कळंब येथे राहत आहे. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यास कालावधी लागणार असल्यामुळे अर्जदार ही अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदार यांना गैरअर्जदार यांच्याकडून प्रति माह रुपये २,०००/–(अक्षरी–रुपये दोन हजार) अंतरीम पोटगीच्या अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून आदेशीत करणे न्यायोचीत होईल. करीता, वरील विवंचनेवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

०१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. गैरअर्जदार यांनी अर्जदारास प्रतिमाह रुपये २,०००/–(अक्षरी–रुपये दोन हजार) अंतरीम पोटगीच्या अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून दयावे.

सही/–
**(ह.ना. पोले),**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
कळंब, जि.यवतमाळ

दिनांक : १८/०४/२०२६
ठिकाण : कळंब.